२१६
जा.क्र.गुनियो/गुनि-७-८/ /२०१९
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-०१,
दिनांक ~~/१२/२०१९~~
02/01/2020

प्रति,

**श्री उमेश चांदिवडे,**
**अवर सचिव (१७ अे)**
**कृषि व पदुम विभाग, मंत्रालय (विस्तार),**
**मुंबई-४०० ०३२**

**विषय :- कृषि निविष्ठा म्यान्युफॅक्चरर्स असोशिएशनने खत (नियंत्रण) आदेश १९८५ आणि किटकनाशक कायदा १९६८ च्या नोंदणीकृत उत्पादनाच्या परवान्या बाबत केलेली तक्रार.**

**संदर्भ:-** १) आपले पत्र क्रमांक.संकिर्ण १६१९/प्र.क्र. ४०/१७अे, दिनांक ०६/०६/२०१९.
२) अॅग्रो इनपुट्स म्यॅन्युफॅक्चरर्स असोशिएशन ऑफ इंडिया यांचा तक्रार अर्ज दिनांक ०२/०२/२०१९

महोदय,

उपरोकत संदर्भीय पत्र क्रमांक २ नुसार अॅग्रो इनपुट्स म्यॅन्युफॅक्चरर्स असोशिएशन ऑफ इंडिया यांनी खते व किटनाशकेच्या संगणकिय प्ररवाने प्रणाली बाबत नोंदवलेल्या तक्रारीचा खुलासा खालील प्रमाणे.

खते, बियाणे व किटनाशके परवान्यासंदर्भात यापुर्वी NIC पुणे यांनी विकसीत केलेल्या Eparwana संगणक प्रणालीद्वारे अर्ज केल्यांनतर अर्जाच्या प्रतीसह सर्व आवश्यक कागदपत्र संलग्न करुन संबंधीतींनी कृषि आयुक्तालयास सादर केल्यानंतरच पुढील कार्यवाही करण्यात येत होती. त्यामध्ये त्रुटीपुर्ततेसाठी अर्जदार स्तरावर लागणा-या कालावधीमुळे परवाना देण्यास उशीर होत होता.

तथापी सद्यस्थितीत माहाऑनलाईन संस्थेमार्फत Eparawana संगणक प्रणाली विकसीत केली असुन जुलै २०१९ पासुन कार्यान्वित झाली आहे. त्यामुळे परवानाधारकाने सर्व कागपत्रासह ऑनलाईन अर्ज दाखल केल्यास व परवाना प्रस्तावातील कायदेशीर कागदपत्र आयुक्तालयास सादर केल्यास ऑनलाईन पद्धतीने परवाना देण्यात येत आहे. त्यामुळे उपरोक्त संगणकप्रणालीतील सर्व दोष दुर करण्यात आले आहेत.

१. संगणकिय प्रणालीतुन अवेदन सादर करण्यासाठी आवश्यक असनारा पुर्ण Access अवेदन कर्त्यास देण्यात आलेला आहे.
२. संगणकिय प्रणालीद्वारे अवेदन सादर केल्यानंतर अनिवार्य अभिलेखांच्या मुळ प्रती भविष्यात उद्भणा-या कायदेशीर बाबींसाठी आवश्यक असल्यामुळे कायदेशीर कागदपत्रांच्या प्रती अवेदनकर्त्यास या कार्यालयात सादर करण्याबाबत सुचित केलेले असले, तरी त्यासाठी त्यांनी विहीत सर्व अभिलेख एकदा कार्यालयात जमा केल्यांनतर त्यांना पुन्हा-पुन्हा या कर्यालयात येण्याची आवश्यक्ता नाही.
३. संगणकिय प्रणालीद्वारे विहीत अनिवार्य अभिलेख Upload करण्यासाठी लागणारी पुरेशी व्यवस्था करण्यात आलेली आहे.

४. संगणकिय प्रणालीद्वारे प्राप्त अवेदन व अभिलेखांमध्ये काही त्रुटी आढळुन आल्यास त्या आवेदनकर्त्यास Present Status या सदराखाली ऑनलाईन पाहता येतात.

५. संगणकिय प्रणालीद्वारे संस्करित होणा-या प्राधिकारपत्रे व परवान्यांसाठी Digital Signature ची सुविधा करण्यात आली असुन सदर परवाने आवेदनकर्त्यास View License या सदराखाली पाहता येतात व त्याच्या प्रती स्वत: छापुन घेता येतात.

६. आवेदन प्राप्त झाल्यापासुन त्यामध्ये काही त्रुटी नसल्यास सदर परवाने उपलब्ध करुन देण्याची प्रकिया जास्तीतजास्त २१ दिवसात पुर्ण केली जात आहे. मात्र त्यामध्ये काही त्रुटी आढळुन आल्यास सदर त्रुटींची पुर्तता होई पर्यंत काही कालावधी व्यपगत होतो व त्यामुळे परवाने देण्याच्या प्रकियेस विलंब होऊ शकतो. मात्र या विलंबास हे कार्यालय जबाबदार नाही.

७. आजतागायत एकुण २७० संगणकिय प्रणालीतुन आवेदने प्रात्प झाली असुन त्यापैकी ५९ आवेदनांचा निपटारा विहीत कालावधीत झालेला आहे. २११ इतकी आवेदने त्रुटी पुर्ततेसाठी प्रलंबित आहे.

८. संघटनेने विनंती केल्या प्रमाणे छाननी समितीत करावे लागणारे सादरिकरण रद्द करण्यात आलेले आहे.

९. गुणवत्ता हमी प्रमाणपत्रासाठी विश्लेषणासाठी काढलेल्या नमुन्यांचे विश्लेषण अहवाल अनिवार्य असुन त्याशिवाय सदर उत्पादकाची गुणवत्ता प्रमाणित करता येत नाही. उत्पादक / विक्रेतेस्तरावर कोढलेल्या व प्रमाणित / अप्रमाणित घोषित झालेल्या नुन्यांचे अहवाल संबंधीत निरीक्षकांकडुन प्राप्त करुन घेणे अनिवार्य आहे.

करिता मुद्देनिहाय स्पष्टीकरण माहितीस्तव सादर.

**मुख्य गुणवत्ता नियंत्रण अधिकारी**
**कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य**
पुणे - ४११ ००१

प्रत-

**ॲग्रो इनपुट्स म्यॅन्युफॅक्चरर्स असोशिएशन ऑफ इंडिया**

२// आपण सदर तक्रार अर्जामध्ये केलेल्या सुचनांचे या कार्यालयाने दखल घेतलेली असुन आपणास विनंती करण्यात येते की, या व्यतीरिक्त आपल्या काही अडचणी किंवा शंका असतील तर त्या आपण तोंडी किंवा लेखी स्वरुपात विहीत प्राधिका-यांकडे मांडल्यास त्यांचे परिमार्जन करणे या कार्यालयास शक्य होईल.